लोकमत

### मुलांच्या वसतिगृहांमध्ये होणार व्यवस्था : 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन उपाययोजना

# विद्यापीठात आणखी ५०० बेडचे आयसोलेशन रुग्णालय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात आता आणखी ५०० बेडचे आयसोलेशन रुग्णालय स्थापित करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाने केले आहे. त्यासाठी मुलांचे वसतिगृह क्रमांक एक, दोन आणि तीनची इमारत ताब्यात घेतली जाणार आहे. त्याबाबतचे पत्र जिल्हा प्रशासनाने विद्यापीठाच्या प्रशासनाला दिले आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने आपत्कालीन उपाययोजना म्हणून जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.




**शिवाजी विद्यापीठातील मुलांच्या तिन्ही वसतिगृहांमध्ये पाचशे बेडचे आयसोलेशन रुग्णालय स्थापित करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाने केले आहे.**

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या मुला-मुलींच्या वसतिगृहात ५०० बेडचे आयसोलेशन रुग्णालय स्थापित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतले. त्यासाठी आवश्यक साहित्य, सुविधा उपलब्ध करुन देण्याची सध्या प्रक्रिया सुरु आहे. आता विद्यापीठातील मुलांचे वसतिगृह क्रमांक एक, दोन आणि तीनमध्ये आणखी ५०० बेडचे आयसोलेशन रुग्णालय करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. संबंधित वसतिगृहे लवकरच ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून सकारात्मक प्रतिसाद देताना विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभागाचे वसतिगृह अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले. आता मुलांची वसतिगृहेदेखील दिली जातील. ते उपलब्ध करुन देण्याचे पत्र जिल्हा प्रशासनाकडून विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. तंत्रज्ञान अधिविभागाच्या वसतिगृहातील रुग्णालयासाठी आवश्यक साहित्य, सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सोमवारी सांगितले.

## वसतिगृहांतील साहित्याचे लवकरच स्थलांतरण

मुलांच्या तिन्ही वसतिगृहांची साधारणत: ७०० बेडची क्षमता आहे. वसतिगृहांतील मुलांसह अन्य साहित्य ठेवण्यासाठी काही खोल्या लागणार आहेत; त्यामुळे या ठिकाणी ५०० बेडची व्यवस्था होऊ शकते. साहित्य स्थलांतरित करण्याची कार्यवाही लवकरच सुरु केली जाईल, असे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.

# एक हजार खाटांचे स्वतंत्र रुग्णालय होणार

## शिवाजी विद्यापीठात चार वसतिगृहांचे अधिग्रहण, उभारणी सुरू



**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठात कोरोनाबाधित रुग्णांसाठी एक हजार बेडचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. यासाठी चार वसतिगृहे प्रशासनाने ताब्यात घेतली असून, तेथे रुग्णालयातील सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कोरोनाच्या रुग्णांची संख्या वाढली तर गैरसोय होऊ नये, यासाठी ही तात्पुरती व्यवस्था आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज दिली.



कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या सीपीआरमध्ये कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार सुरू आहेत. लगतच्या भविष्यात रुग्णांची संख्या वाढली तर सीपीआर अपुरे पडण्याची शक्यता आहे. अशा काळात दुसरी सक्षम व्यवस्था असावी, यासाठी प्रशासनाने विद्यापीठाच्या चार वसतिगृहांमध्ये कोरोना रुग्णालय सुरू करण्याची तयारी केली आहे. यासाठी प्रशासनाने विद्यापीठाला पत्र दिले होते. या पत्राला सकारात्मक प्रतिसाद देत विद्यापीठाने चार वसतिगृहे प्रशासनाच्या ताब्यात दिली आहेत. यातील तंत्रशिक्षण विभागातील एक वसतिगृह प्रशासनाने गेल्या आठवड्यात ताब्यात घेतले. तेथील सर्व साहित्य स्टोअररूममध्ये ठेवून येथे रुग्णालयासाठी आवश्यक असणारे साहित्य आणण्यात आले आहे. आज प्रशासनाने मुख्य इमारतीच्या आवारातील मुलांची तीन वसतिगृहे ताब्यात घेतली. येथील साहित्यही हालवण्यात आले. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणार आहे.

विद्यार्थी गावी गेल्याने विद्यापीठातील वसतिगृहे रिकामी आहेत. शहरापासून लांब असल्याने येथे संसर्ग होण्याचाही धोका कमी आहे. मुबलक वीज, पाणी असून भोजन बनवण्यासाठीची स्वतंत्र व्यवस्थाही आहे.

> **चार वसतिगृहात मिळून एक हजार बेडचे रुग्णालय उभारण्यात येईल. आवश्यकता पडल्यास आसपासच्या जिल्ह्यातूनही रुग्ण येथे आणता येतील. या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाची निवड करण्यात आली. हे रुग्णालय तात्पुरते असून, संख्या वाढली तरच याचा उपयोग करण्यात येईल.**
>
> – डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठात गरजेनुसार कर्मचारी कामावर

शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारत व परीक्षा विभागात मिळून ४५० अधिक कर्मचारी आहेत. यामध्ये नियमित व रोजंदारी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. दरम्यान लॉकडाऊन लागू झाल्यापासून बहुतांश कर्मचारी सुट्टीवर आहेत. ज्या विभागाचे काम आहे, त्या विभागातील काही कर्मचाऱ्यांना बोलावून घेतले जाते. आस्थापना, पगार, सेवानिवृत्तीसंदर्भातील कागदपत्रांची पूर्तता यासाठी गरजेनुसार कर्मचारी कार्यरत आहेत. विद्यापीठातील बहुतांश अधिकाऱ्यांनी 'वर्क फ्रॉम होम'नुसार कामकाज सुरू केले आहे. कार्यालयीन कामकाजाविषयी ऑनलाइन चर्चा होते. तर काही अधिकारी कुटुंबासमवेत वेळ घालवित आहेत. परीक्षा विभागाचे काम सध्या ठप्प आहे. अन्य सरकारी कार्यालयात पहिल्यांदा पाच व नंतर दहा टक्के कर्मचारी कामावर रुजू झाले. विद्यापीठात मात्र गरज असेल तर कर्मचारी कामावर असे चित्र आहे. अधिविभागाचे कामकाज बंद आहे.